# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission


MERC/ADM/RTI/003/2021/**058** Dt. 18.02.2021

प्रति,
श्री. जगनसिंह राजपूत (जेष्ठ नागरीक),
ओमसाई निवास, बॅरेक नंबर ८,
रूम नं. ४, उल्हासनगर-१,
जि. ठाणे - ४२१००१

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि. २०.०१.२०२१ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि.२१.०१.२०२१ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| १ | आपल्या कार्यालयात दि. १९.१०.२०२० रोजी कलम १४२ अंतर्गत कारवाई साठी अर्ज पाठविण्यात आला असता काय कारवाई दोषी अधिकाऱ्यांवर करण्याचे आदेश देण्यात आल्याच्या स्वाक्षरी प्रती मिळाव्यात. | आपला दि. १९.१०.२०२० रोजीचा अर्ज पुढील कार्यवाहीकरिता महावितरण कार्यालयास दि १२.११.२०२० रोजी अग्रेषित केलेला आहे. |
| २ | आपल्या विज नियामक आयोगाच्या अधिन असलेल्या न्यायालयाच्या आदेशाची विज वितरन कंपनीचा अधिकारी अवमानना करून आदेशाच्या मुदतीत निव्वळ भ्रष्टाचारासाठी करत नाही म्हणून आम्ही तक्रार केली असता कोणत्या न्यायालयाच्या आदेशाने दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली नाही त्या न्यायालयाची आदेशाची प्रत स्वाक्षरी मिळावी. | आपणांस नेमकी कोणती माहिती हवी आहे याचे बोध होत नाही.. कृपया माहितीचा अधिकार अधिनियम कलम 2 मधील उपखंड (च) प्रमाणे मागावी. जेणे करुन जन माहिती अधिकारी यांना आपणांस योग्य माहिती पुरविणे शक्य होईल.<br>माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये प्रकरण 1 मधील 2 (च) नुसार "माहिती" (Information) याचा अर्थ, कोणत्याही स्वरूपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने (Memoes), ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने, (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणांस मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो. |
| ३ | आपल्या राज्यामध्ये चुकीच्या पध्दतीने २०१७ ऑक्टोबर मध्ये ग्राहकाकडून बिल वसुलले त्यासाठी विद्युत लोकपाल अंतर्गत न्यायमंच मंडळ -२ चा आदेश असतांना ग्राहकांस परतावा ८.१२.२०२० रोजी देण्यात आला बिनव्याजी का ग्राहकास व्याज देवून फक्त घ्यावे असा जिआर असल्याची स्वाक्षरी प्रत मिळावी. | |

| | | |
|---|---|---|
| ४ | ग्राहक क्र. ०२१५१७००४२१६ अंतर्गत आदेश क्र. ४०५१ दि. २४.१२.२०१९ ग्राहक क्रमांक ०२१५१०९४४५९१ अंतर्गत न्यायमंच आदेश क्र.०७५६ दि.३.०३.२०२० ग्राहक क्र. ०२१५१०९४४५९१ अम्बुसमंड मुंबई -५१ आदेश क्र. १९४/२०१९ या ग्राहकाचे जास्त बिल ऑक्टोबर २०१७ मध्ये घेण्यात आले असता सदर न्यायमंचाचा आदेश असताना ८.१२.२०२० रोजी रक्कम बिनव्याजी देण्यात आली असता अशा ग्राहका अन्याय विरोधी अधिकाऱ्यांवर नियमबाहय कारवाई करू नये असा विज नियामक किंवा शासनाच्या आदेश असल्याची स्वाक्षरी प्रत मिळावी हि नम्र विनंती. | आपणांस आवश्यक असलेली माहिती महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २०२० मध्ये उपलब्ध आहे.<br><br>सदर विनियम आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळावर मोफत स्वरूपात उतरवून घेण्याकरिता उपलब्ध करण्यात आलेले आहेत. |

** Please note that above Regulations and details is available in public domain on the Commission website in downloadable format on www.merc.gov.in. As per the Hon'ble CIC decision No. CIC/YA/A/2014/000379/SB Dated 19.09.2016 in the matter of Shri. K. Lall Vs M. K. Bagri, Assistant Registrar of Companies and CPIO, Appeal No. CIC/AT/A/2007/00112, dated 12.04.2007, since the same is available in public domain, the PIO is not obliged to provide the same to the appellant under the RTI Act.

माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये श्री अनिलकुमार उके, संचालक (विधी) प्रभारी /प्रथम अपीलीय अधिकारी आहेत. पत्ता:- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर १, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई - ४००००५. दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३९६४/ ६५/ ६९ **Email: anilkumar.ukey@merc.gov.in**

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी